1990

खंड 2 अंक 4 व 5

# चैतन्य लहरी

1990

मराठी आवृत्ती



"संवयी राहतात त्या समर्थन केल्यामुळे."

- श्री माताजी निर्मलादेवी

श्री माताजींचा दक्षिण-भारत दौरा -

हैद्राबाद, मद्रास, बंगलोर, अहमदाबाद आदिशक्तिंनी आशीर्वादीत केले. परमचैतन्याने सर्व कांही इतक्या सुरेख त-हेने केले की प्रेम व आनंदाच्या लहरींनी हजारो साधकांच्या हृदयाची कवाडे उघडली. सभेनंतर श्री माताजींनी तासन् तास प्रत्येकाचे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यात घालवले. अनेक लोकांचे दुर्धर रोग आणि प्राणघातक दुखणी चमत्कारिकरित्या बरी झाली.

हैद्राबादमध्ये अचानकपणे आम्ही एका महान, शालिवाहन राजाच्या पुतळयाजवळ आलो. या भागामध्ये खूप वर्षे शालिवाहनांनी राज्य केले होते असे श्री माताजींनी सांगितले. साधकांच्या भक्तिची परिपूर्णता म्हणजे सहजयोग आहे. आणि हजारो साधकांना आत्मसाक्षात्कार मिळण्याची वेळ आली आहे, असे श्री माताजींनी सांगितले. महिषासूरा च्या मर्दनासाठी आम्ही सर्वांनी प्रार्थना केल्याप्रमाणे एक महिषासूरमर्दिनी पूजा सहजगत्या बंगलोरमध्ये झाली.

श्री कृष्णाची भूमी गुजराथ. तेथील लोकांची विशाल हृदये पाहून श्री माताजी आनंदीत झाल्या आणि त्यांना आत्मसाक्षात्कार सहजच मिळाला. श्री माताजींनी त्यांना सांगितलेल्या अनेक गोष्टी चैतन्य लहरींच्या या अंकात आपल्याला वाचायला मिळतील.

हैद्राबाद पुजा 7 फेब्रुवारी 1990

आपणां सर्वांना भेटून अत्यंत आनंद झाला. इतके सहजयोगी हैद्राबादमध्ये आले आहेत ह्याची मला कल्पनासुध्दा नव्हती. हे हैद्राबादचे वैशिष्ठय आहे, की सर्व प्रकारचे लोक एकमेकात मिसळले आहेत. आतां आपल्या ला सहजयोगाकडे नव्या पध्दतीने वळायचे आहे. हें समजणं आवश्यक आहे की सहजयोग सत्यस्वरुप आहे, आणि आपण सत्यनिष्ठ आहोत, त्यामुळें आपल्याला असत्याचा त्याग केला पाहीजे नाही तर आपल्यामध्ये शुध्दता येऊ शकत नाही. वास्तविक असत्य हा एक भ्रम आहे, आणि त्यातून निघण्यासाठी आपल्याला निश्चय केला पाहिजे. अशा शुध्द इच्छेमुळेच कुंडलिनी, जी आपल्यामध्ये जागृत आहे, ती आपल्यासमोर अशी स्थिती आणून देते की सत्य आणि असत्य यामधील भेद आपल्याला समजतो, आणि फक्त सत्य मिळवण्याची इच्छा आपण करुं लागतो.

आपल्या सर्व चुकीच्या धारणांचा त्याग करून केवळ सत्याला आत्मसात केले पाहिजे. अशी ही एक धारणा की, गीतेमध्ये म्हटले आहे कीं आपली जात जन्मावर अवलंबून असते. पण हे काही सत्य नव्हे कारण व्यासांनी, ज्यांनी गीता लिहीली ते स्वतः एक कोळीणीचे असे पुत्र होते, कीं ज्यांच्या पित्याचा सुध्दा पत्ता नव्हता. त्यामुळे व्यासमुनी अशी गोष्ट लिहू शकतच नाहीत. असे म्हटले आहे,

" या देवी सर्वभूतेषु जातिरूपेण संस्थिता"

म्हणजे सर्वांच्या आंत असलेली त्याची जात म्हणजे, जन्मजात असलेली आवड असते. कोणाला पैशांचा शोध, कोणाला सत्तेचा, कोणाला परमात्म्याच्या शोधामध्ये रुचि असते. सहजयोगामध्ये प्रथम तेच लोक येणार जे परमेश्वराला शोधित असतात. आणि परमचैतन्याला मिळवूं इच्छितात.

जेव्हा माणसाचा सहजयोगाकडे ओढा असतो तेव्हा त्याला कधी कधी दुःख होते की सहजयोग इतका हळूहळू कां वाढतो आहे. पण आपल्याला हे समजलं पाहीजे, कीं जी जिवंत गोष्ट असते ती हळूहळू पल्लवित होते. जसे एखादया वृक्षाचे हळू हळू वाढणे, आणि त्यावर प्रथम दोन फुलें आणि नंतर अनेक फुलांचे उगवणे. सहजयोग एक जिवंत गोष्ट आहे. यामध्ये आपण कोणावर जबरदस्ती करूं शकत नाही. आपण कोणालाही असेच म्हटले की "तुम्ही पार झालांत", तर तसे होऊ शकत नाही. हे "व्हावं" लागतं. आणि जोपर्यन्त हे होत नाही, तोपर्यन्त आपण कोणालाही खोटं प्रमाणपत्र देऊं शकत नाही. आणि सगळेच लोक पार होतील असे सांगू शकत नाही. अनेक कारणांमुळे काही लोक पार होत नाहीत. बहुतांशी लोक असा विचार करतात. की यांसाठी इतकी तपस्या करावी लागत होती, हिमालयांत जावे लागत होते, तर आतां हे इतके सहज, सरल कसे होऊ शकते? त्यांचा विश्वास बसत नाही कारणं त्यांच्यामध्ये आत्मविश्वास नसतो. त्यांना समजू शकत नाही, कीं ही वेळच अशी आहे, जेव्हा हे कार्य सहजच होणार आहे.

जेव्हा आत्मसाक्षात्कार मिळतो आणि परम चैतन्याशी एकात्मिकता साधली जाते तेव्हा हे ज्ञात होते की आपले सर्व कार्य परमचैतन्यच करते आहे. आणि आपण अकर्मामध्ये उतरतो. काही चिंताच उरत नाही. पण सहजयोगामध्ये आल्यानंतर, सुरुवातीला कधी, माणूस अल्पदृष्टीने विचार करतो आणि स्वतःला कर्ता समजून राहतो. पण हळूहळू अनुभवांच्या आधाराने त्याला समजते की त्याच्या करण्याने काही होत नाही. आणि विश्वास होतो की परमचैतन्यच सर्व कार्य करते आहे. आणि त्यावेळी आपोआपच सर्व कार्य होत जाते. जर कधी कधी कुठले कार्य आपल्या मनाविरूध्द घडले तर परमात्म्याने आपल्याला मदत केली नाही असा विचार करतां नये.

सहजयोगाची दोन अंगे आहेत. आणि सहजयोग्याला या दोन्ही अंगांना संभाळले पाहीजे.

पहिल्यांदा व्यक्तीगत ध्यान धारणाच्या योगे आपल्याला आपल्यामधील दोष जाणून घेतले पाहीजेत. आणि आपली कुठली स्थिती आहे हे जाणून घेतले पाहीजे. म्हणजेच आपण उजवीकडील ‡ राईट साईडेड ‡ आहोत की डावीकडील ‡ लेफ्ट साईडेड ‡. आपल्या कुठल्या कुठल्या चक्रांमध्ये दोष आहेत. छायाचित्रापुढे ध्यान करुन सर्व जाऊं शकतात. त्यानंतर ध्यान धारणेने या सर्व दोषांना दूर केले पाहीजे. सहजयोगामध्ये ध्यानधारणेची पध्दत खूप सरळ आहे. सकाळी-संध्याकाळी दहा पंधरा मिनीटे बसूनसुध्दा ध्यानधारणा होऊं शकते. आपले दोष काढून टाकल्यावर सामूहिकतेमध्ये उतरले पाहिजें. यांसाठी आवश्यक हे की, आपले हृदय आपण उघडले पाहीजे. संकुचित प्रवृत्तीची व्यक्ति कधीच सामुहिक होऊ शकत नाही. आपण दुस-यांच्या दोषांकडे पाहतां नये. कारण यामुळें दुस-यांचे सर्व दोष आपल्यामध्ये येतात. आपल्याला दुस-यांचे गुण, चांगुलपणा, सौंदर्य पाहिले पाहीजे. यामुळे आपल्यामधे सौंदर्य येईल आणि दुस-यांचे दोषही लुप्त होतील. हे जाणले पाहीजे की दुसरे "स्वयं" पासून वेगळे नाहीत. त्यामुळें त्यांच्या दोषांना प्रेमशक्तिने दूर केले पाहीजे. प्रेम म्हणजेच सत्य आहे आणि सत्य म्हणजेच प्रेम आहे. जो प्रेमाची शक्ति वापरतो तो खूप उच्चस्तराला पोहोचतो. हृदय उघडून प्रेमाने आपल्याला दुस-यांकडे पाहीले पाहीजे. त्यामुळे आपण व्यक्तिगत रित्या, आणि सामुहिकरित्या प्रगती करतो. जी व्यक्ति सामुहिकतेमध्ये उतरत नाही, तिच्यापासून जपून राहीले पाहिजे. कोणत्याही सहजयोग्याची निंदा ऐकणे आपल्या सहजयोगांत पापाप्रमाणेच आहे. आपण किती प्रेमाने बोलू शकतो, आपल्यामध्ये किती क्षमा-शक्ति आहे, हे आपण पाहिले पाहीजे. सगळ्या सहजयोग्यांना आपले नातेवाईक समजले पाहीजे.

सहजयोगाचे दुसरे अंग आहे, सहजयोगाचे ज्ञान होणे आणि सहजयोगाचा प्रचार. सहजयोगामध्ये या ज्ञानाची माहिती पाहीजे, की कोणत्या चक्रामध्ये दोष असल्यावर हाताच्या किंवा पायाच्या बोटावर पकड येते त्यामुळे कुठले रोग होऊ शकतात. त्यांचे निवारण कसे केले पाहिजे. दुस-यांना आपण कसे ठीक करु शकतो हे सर्व कुंडलिनीचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे. विशेषतः स्त्रियांच्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. कारण स्त्री, शक्तिचे स्वरुप आहे. या ज्ञानाच्या योगे स्त्रिया सहजमधील मुलांना समजू शकतील. "सहज" मध्ये जन्मलेली मुले अशी कामे कां करतात, त्याचा अर्थ काय आहे, बुध्दीने हे समजून घेणे अत्यन्त आवश्यक आहे. आणि दुसरी एक गोष्ट खूप जरुरी आहे ती म्हणजे सहजयोगाचा प्रचार. जर आपण एका खोलीत बसलो असाल. आणि एकच दरवाजा उघडा आहे आणि दुसरा दरवाजा आपण उघडला नाही. तर वा-याचा प्रवाह थांबेल. त्याप्रमाणेच जर सहजयोग आपण दुस-यांना दिला नाही, त्यांना मदत केली नाही, त्यांना आत्मसाक्षात्कार दिला

नाही, त्याचा प्रचार केला नाही, तर आपण प्रगति करू शकत नाही. कारण वृक्ष जेव्हा वाढतो, तेव्हा त्याच्या फांदया वाढल्या पाहिजेत. आणि त्या फांदयांच्या छायेमध्ये अनेक लोकांना बसले पाहीजे. ही तर वृक्षाची गोष्ट झाली. पण आपण तर वट-वृक्षाप्रमाणे आहांत. त्यामुळे आपल्याला पुर्णपणे सहजयोगाच्या प्रचारामध्यें मदत केली पाहीजे. आपल्याला यांसाठी पूर्णपणे तन मन धन समर्पण केले पाहिजे. काही असे सुध्दा सहजयोगी आहेत, जे पूर्णवेळ सहजयोगाचाच विचार करीत राहतात. आणि एके दिवशी पृथ्वीवर स्वर्गच अवतरेल असा विचार करतात. अशा लोकांचे सर्व प्रश्न सुटतात आणि ते नेहमीच आनंदाच्या स्थितीमध्ये राहतात. आपल्यावर एक महान उत्तरदा-यित्व आहे असा एक समाज निर्माण केला पाहिजे, जो शुध्द, निर्मळ आहे. त्यातच आपली धारणा असेल आणि त्याच धर्ममध्ये आपण स्थित होऊ.

आपणां सर्वांना माझे अनंत आशिर्वाद.

कृपया

चैतन्यलहरीची वार्षिक वर्गणी रु.एकशे आठ आपल्या पत्तयासोबत खालील पत्त्यावर डिमांड ड्राफ्टनेच पाठवावी. डिमांड ड्राफ्ट हा खालील नांवावर पाठवावा.

"डिव्हाईन कूल ब्रीझ"

पत्ता डिव्हाइन कूल ब्रीझ
पो.बॉ.नं. 1901
कोथरूड, पुणे 411029.

ज्यांना रोकड पैसे द्यावयाचे असतील त्यांनी ते आपापल्या केंद्र प्रमुखाकडे नांव व पत्त्यासकट द्यावे.

वार्षिक वर्गणी : डिव्हाईन कूल ब्रीझ

| | | |
|---|---|---|
| इंग्लिश | : | रुपये 200/- एक वर्षाकरता |
| मराठी | : | रुपये 108/- एक वर्षाकरता |
| हिंदी | : | रुपये 108/- एक वर्षाकरता |

जाहीर सभेतील भाषण - मद्रास 2, फेब्रुवारी 90

सत्य विकता येत नाही. ते घडविता येत नाही. ते संघटीत करता येत नाही. ते बुध्दीने किंवा भावनेने समजून घेता येत नाही. आपल्या उत्क्रांतिच्या प्रक्रियेमध्ये जे सत्य आपल्याला समजले आहे, ते नेहमी सेंट्रल नर्व्हस सिस्टिमवर जाणले गेले आहे. उदाहरणार्थ, माझ्या डोळ्यांनी, इथलीही नक्षी मला दिसते आहे. वस्तू थंड आहे, की गरम आहे, ते स्पर्शाने कळते. आपण ते जाणू शकतो. त्याप्रमाणे सत्यसुध्दा तुमच्या सेंट्रल नर्व्हस सिस्टिमवर तुम्ही जाणूं शकतां. "हे सत्य आहे. हे सत्य आहे" अशी एक बुध्दीची कल्पना, ते असूं शकत नाही. प्रत्येकाला सत्य जाणले पाहीजे कारण ते पूर्ण आहे. जे पूर्ण आहे, ॲबसोल्यूट आहे त्याबद्दल वादविवाद होऊ शकत नाही, त्याचे वेगवेगळ्या प्रकारे विश्लेषण होऊ शकत नाही. ही पाहातांक्षणी लक्षांत येणारी गोष्ट, आपण समजून घेतली, तर आपल्याला कळेल की सत्य जाणण्यासांठी, या मानवी जाणिवेच्या पलीकडे आपल्याला जावे लागते. आणि सत्य म्हणजे सर्वत्र पसरलेली ईश्वरी प्रेमाची शक्ति आहे. प्रेम म्हणजे सत्य. आणि सत्य म्हणजे प्रेम. पण हे प्रेम ईश्वरी प्रेम आहे. ईश्वरी प्रेम मर्यादित नाही. वृक्षाच्या आंत वहाणा-या प्राण-रसाप्रमाणे वृक्षाच्या विविध भागांत ते जाते, व परत जाते. समजा, ते एका फुलाला चिकटले तर पूर्ण वृक्षाला व्यथा होऊन तो मरेल. शेवटी ते फूलसुध्दां नष्ट होईल. तर हे अलिप्त प्रेम आहे. ईश्वरी प्रेम हे मर्यादित नसते. हे जे प्रेम आहे, त्यानेच या विश्वाला संघटित केले आहे, ही पृथ्वीमाता, आणि सर्व ग्रहांमधील अंतरे, सारे कांही आपली उत्क्रांत त्याने संघटीत केली आहे आणि मुक्तता करून मानवी जाणिवेच्या पातळीपर्यंत आणले आहे. पण मानवी जाणीव पुरेशी नाही. ती जर पुरे असती तर मतभेद झाले नसते. प्रत्येकाला वाटते, त्याचे बरोबर आहे. अशा प्रकारे स्वतःलाच प्रमाणपत्र दाखला देणे खरे नव्हे.

या अभिनव युगांत जर कोणी ईश्वरी प्रेमाबद्दल बोलले, तर ते कांहीतरी मागासलेले आहे असे त्यांना वाटते. ते कांहीतरी "अक्षय अस्तित्व" आहे. ते थोडा वेळ ओसरेल, पण आपल्यासांठी त्याला परत आले पाहीजे. आपल्या हितांसाठी, आणि आपले ध्येय साध्य करण्यासांठी. शेवटी, आपण या पृथ्वीवर कशासांठी आहोत? आपण कशासांठी जन्मलो? आपले ध्येय साध्य करण्यासाठी. शेवटी, आपण या पृथ्वीवर कशासांठी आहोत? आपण कशासांठी जन्मलो? आपले ध्येय काय? पूर्ण वेळ पैसा, सत्तेसंबंधातली नाती आणि भावनिक गोष्टी यांच्याशी झगडणे की कांहीतरी उच्चतर साधणे? हे सर्व ब्रम्हचैतन्य आपल्या सभोंवार आहे, हे मी म्हणत असेल, तर या पायरीवर हे एक गृहीत धरले आहे, हे समजण्यासांठी तुम्हांला शास्त्रीय दृष्टीकोन असला पाहिजे. पण नंतर जर मी हे सिध्द केले, तर "सत्य" म्हणून तुम्ही ते स्विकारले पाहीजे. प्रामाणिक लोक म्हणून तुम्ही ते स्विकारले पाहिजे. हे जर सर्व मानवजातीच्या बंधनमुक्तीसांठी असेल, पूर्ण मानवजातीच्या हितासांठी असेल तर ते कां घेऊ नये?

सुरवातीलाच मी तुम्हांला सांगितले की सत्य विकता येत नाही. सत्य विकणारे, देव विकणारे, विविध प्रकारच्या अनेक गोष्टी बाजारांत विकणारे लोक आहेत. सत्याला पैशाशी कांहीं करावयाचे नाही. पैसा ही मानवाची निर्मिती आहे. तेव्हा हे ब्रम्हचैतन्य जाणून घेण्यासाठी, ज्या गोष्टीचा आपल्यांत अभाव आहे, जी आपण अजून जाणली नाही, आपला संबंध जुळला नाही, आणि हा संबंध प्रस्थापित केला पाहिजे. हे सहज शक्य आहे. जिला आपण कुंडलिनी म्हणतो ती आपल्यामध्ये घटीत असलेली शक्ति आहे. जी साडेतीन वेटोळ्यांमध्ये असते. आणि तुमच्या टाळूमध्ये भेदन करण्यासांठी सहा चक्रातून उत्थान पावते आणि तुमच्या हातांला थंड वारा जाणवूं लागतो. आणि तुमच्या डोक्यांतूनही थंड हवा बाहेर पडूं लागते. मग तुम्ही स्वतःला दाखला देऊं शकतां. कोणीही तुम्हांला दाखला देणार नाही आहे. हे बीचे पहिले अंकुर फुटणे आहे. हे जिवंत बी आहे. सहज अंकुरते. आणि त्याचा प्रभाव तुमच्या शारिरिक, मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिक व्यक्तित्वावर झालेला तुम्ही पाहूं लागतां जो विलक्षण, प्रचंड असतो. अविश्वासनीय, आश्चर्यकारक तुमच्या कल्पनेची झेपही पोहोचणार नाही असे ते असामान्य दृश्य असते. पण तुम्ही ते असतां. तुम्ही ती उज्वल वस्तू असतां. ती उज्वलता तुमच्यामध्यं असते. त्या असामान्यतेसाठी उज्वलतेसाठीच तुम्हांला बनवले असते. ते सौंदर्य उपभोगण्यासाठी. आणि तुम्ही त्याचा आस्वाद घेतला पाहिजे. तुमचा योग ईश्वरी शक्तिशी संबंध मिळवणे हा तुमचा हक्क आहे. इतकेच नव्हे तर तो सहज आहे. म्हणजे सहजगत्या मिळालेला. पण खरे म्हणजे सह म्हणजे अंकुराबरोबर जन्मलेला. तुमच्याबरोबर जन्मलेला.

कुंडलिनी म्हणजे आपल्यामधील शुध्द इच्छा. इकॉनॉमिक्सचे नियम प्रतिपादन करतात की सर्व साधारणपणे इच्छा तृप्ती देणा-या नसतात. म्हणजे तुम्हांला आज एक हवे असते, उद्या दुसरे कांही हवे असते. आपल्याकडे जे कांही आहे, त्यांना आपण कधीच समाधानी नसतो. याचे कारण म्हणजे, आपण जे कांही मागतो किंवा ज्याची इच्छा करतो, ती शुध्द इच्छा नसते. तर मग शुध्द इच्छा म्हणजे काय? शुध्दावस्थेत किंवा बेशुध्दावस्थेत तुमची शुध्द इच्छा असते, ईश्वरी शक्तिशी ऐक्य साधण्याची. आणि ही इच्छा पूर्ण केल्याशिवाय तुमच्या जीवनांत तुम्ही कधीच समाधानी राहू शकत नाही. तर ही शुध्द इच्छेची शक्ति त्रिकोणाकार अस्थिमध्ये वास्तव्य करून असते. कुंडलिनी मुलाधारामध्ये मुलाधार चक्राच्यावर असते ते माहीत असणे महत्वाचे आहे. कारण हे लोक जे म्हणतात की कामेच्छा कुंडलिनी जागृति करतात, ते पूर्णपणे चूक आणि सत्य परिस्थितीच्या विरोधांत आहेत. ते चुकीचा मार्ग दाखविणारे लोक आहेत व आपल्या कमकुवतेचा ते फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. कारण मुलाधार चक्र पेल्विक प्लेक्सस जें उत्सर्जन संस्था व काम संस्था दोघांसाठी जबाबदार असते. त्याची काळजी घेते. त्यामुळे थावेळी अशा सर्व क्रिया थांबतात. मनुष्य अबोधिततेत उतरतो व कुंडलिनी उत्थान पावते. आपण कोणतीही गोष्ट करतांना, किंवा कांहीही समजवून घेतांना लहरी, दुराग्रही, अहंकारी असतां कामा नये. आपल्यासाठी काय चांगले आहे, हिताचे काय आहे, समाजासांठी चांगले काय आहे, मानवतेसांठी चांगले काय आहे याचा संतुलितपणे विचार केला पाहिजे. जर कोणाला स्वतःच्या कमीपणाचा विचार करून जे लोक त्यांच्या अहंकाराचे फाजिल लाड करतात त्यांच्यामागे थांबत सुटायचे असेल, तर ते त्यांच्या नाशाकडे चालले आहेत.

तर आतां, जो कोणी पृथ्वीमातेप्रमाणे असेल, त्याच्या उपस्थितीमध्ये कुंडलिनीचे उत्थान होते. किंवा कोणी सहजयोगी असेल, ज्याला कुंडलिनीचे उत्थान करून आत्मसाक्षात्कार कसा द्यावा याची माहीती असेल तर. कुंडलिनी ही तुमची वैयक्तिक आई आहे. तिच्याकडे तुमच्याविषयीच्या सर्व गोष्टींची नोंद आहे. प्रत्येक आणि एकूण एक गोष्ट तिला माहीत आहे. तिला तुमचे हृदय माहीत आहे. तुमचे मन माहीत आहे. सर्वकांही माहीत आहे. आणि ती तिला उठविण्याची वाट पहात चांगल्या त-हेने स्थित झाली आहे. तेव्हा ती त्रास देते असे म्हणणे हे दर्शविते की ज्यांना अधिकार नाही, किंवा ज्यांना त्याविषयी कांहीच माहिती नाही ते लोक हे काम करीत आहेत. समजा एखाद्याने प्लगमध्ये बोट घातले आणि मला प्लगमुळे शॉक लागला असे म्हटले तर सहाजिकच आहे कारण त्याविषयी तुम्हांला माहीतीच नाही.

जेव्हां आपण खूप विचार करतो, तेव्हां आपल्या मेंदूमधील ग्रे पेशी वापरतो. पण त्या कशा भरून काढल्या जातात. त्यांची संख्या कशा पध्दतीने वाढते, त्यांची वाढ कशी होते, कोणीच सांगू शकत नाही. मेंदूच्या वापरांसाठी स्वाधिष्ठानचक्र {फॅट सेल्स} पेशींचे परिवर्तन करते. याशिवाय ते तुमचे लिव्हर, पॅनक्रिआस, स्प्लीन, आंतड्याचा कांही भाग व किडनी {मूत्रपिंड} यांची काळजी घेते. इतके काम त्याला करावयाचे असते. पण तुम्ही जर भविष्यवादी असाल, पूर्ण वेळ योजना आंखत, खूप विचार करीत तर या बिचा-या चक्राला तुमच्या मेंदूसाठी फॅट सेल्सचे परिवर्तन करण्याचे हे काम करावे लागते. त्याचा परिणाम म्हणून या सर्व अवयवां-कडे दुर्लक्ष होते. त्यामुळे अशा लोकांना लिव्हरचा त्रास होतो. दुसरी गोष्ट म्हणजे डायबिटीस. तुमच्या पॅनक्रिआसकडे दुर्लक्ष केले गेल्याने डायबिटीस होतो.

तिसरी गोष्ट म्हणजे स्प्लीन आहे. स्प्लीन हा स्पिडॉमीटर आहे. पूर्ण वेळ ती ताल साधित असते. हल्लीच्या दिवसांत आपण फार उद्योगांत गुंतलेले असतो. कांही न करता गुंतलेले. स्प्लीन ही अत्यावश्यकतेसाठी असते. अत्यावश्यकतेसाठी ती लाल रक्तपेशी तयार करूं लागते. त्यामुळे जेव्हां आपण वर्तमानपत्र वांचतो, अत्यावश्यकता निर्माण होते कारण नेहमीच कांहीतरी धक्कादायक बातमी असतेच. कोणी वारले आहे, कोणी मारले गेले, कोणावर सुरेहल्ला, कुठे चोरी, तुम्हाला चांगली बातमी त्यांनी द्यावयाचीच नसते. आयुष्यातील असमंजस गोष्टींकडे असणारे हे अनैसर्गिक लक्ष धक्के देते व त्याचा परिणाम म्हणून स्प्लीनला लाल रक्तपेशींचा पुरवठा वाढवावा लागतो. त्यामुळे ती कार्यान्वित होते. नंतर सकाळी आपल्याला वेळ नसतो. कांहीतरी खायचं थोडसं कुरतडायचं, बेतालपणे आणि ऑफिसला धांव मारायची आणि त्यांतही साहेबाबरोबर कांही अडचण असेल तर झालंच. अशा त-हेचं धकाधकीचं जीवन आपण जगत असलो तर बिचा-या स्प्लीनला अशा घाईघाईच्या व्यक्तिमत्वाशी कसं पटवून घ्यायचं, हेच कळत नाही. पोला. हे कळत नाही, कीं केव्हां लाल रक्तपेशी तयार करायच्या, की थांबवायच्या त्यामुळे ती घाईघाईने तांबड्या पेशी तयार करत जाते आणि ते सर्व या अवयवासाठीं फार घाईगर्दीचे, वेडेपणाचं होतं. त्याशिवाय त्याचं दुर्लक्ष होतं. त्यामुळे त्याचा स्वतःचा ताल साधला जात नाही आणि आतां तो कॅन्सरला, मुख्यत्वे करून ब्लड कॅन्सरला सहजसाध्य असा होतो.

त्यामुळे मेन्स बरोबरचा संबंध तुटतो. मग तर नियंत्रणच रहात नाही. कॅन्सर पेशंटमध्ये पेशी लहरीप्रमाणे वागतात त्या स्वतःहून काम करु लागतात. त्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव होऊ लागतो. पण जेव्हां कुंडलिनीचं उत्थान होतं तेव्हां ती त्या केंद्रामधून जाते, त्यांना जागृत करते, त्यांचं पोषण करते. त्यांना बरोबर करते. आणि अशा त-हेने तुमचे चित्त मध्यावर येते. अडचणी सोडविल्या जातात. जसे खराब मूत्रपिंडापासून होणारा ब्लडप्रेशरचा त्रास सोडवला जातो. तसे भविष्यवादी लोकांचे बाकीचे अनेक प्रश्न सोडवले जातात.

भविष्यवादी लोकांचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे भविष्य कधी अस्तित्वांत नसतं. त्यांना भविष्याबद्दल आशा असतात आणि जेव्हां त्या कार्यान्वित होत नाहीत तेव्हां ते निराश होतात. आणि आशा निराशा यांच्यामधील लटकण्यामध्ये त्यांचे एक विचित्र प्रकारचे व्यक्तिमत्व तयार होते आणि त्या प्रकारच्या व्यक्तिमत्वामध्ये मला वाटते की ते ज्याला आपण सायकोसोमॅटिक म्हणतो तसे कांही रोग त्यांच्यामध्ये उत्पन्न होतात. जे फार गंभीर स्वरूपाचे असतात. त्याशिवाय या भविष्यवादी लोकांच्या दारावर एक अति भयानक शत्रू वाट पहात असतो तो म्हणजे हार्ट अॅटॅक. इतके जर तुमचे चित्त बाहयांत असेल, योजना करणे, पैसे करणे, सत्ता, या त्या गोष्टींसाठी भांडणे करणे, तुमच्या हृदयाकडे चित्त नसेल, तुमच्या भावनिक बाजूकडे चित्त नसेल, जसे कांही लोक, खूप कामसू असणारे "वर्कोहोलिक्स", ज्यांना बायकोसाठी वेळ नसतो, कुटुंबासाठी वेळ नसतो, भावनेच्या अभिव्यक्तिसांठी वेळ नसतो, ते फार शुष्क लोक होतात. बाहेरून कदाचित ते चांगले दिसतील पण तसे ते नसतात. आंतून ते अत्यंत शुष्क असतात आणि हृदयविकाराचा मोठा झटका त्यांना सहज येऊं शकतो. याचं कारण असं की हृदयांत आत्म्याचं वास्तव्य आहे आणि आत्म्याकडे इतके दुर्लक्ष केले तर हृदयविकाराचा झटका येणे अपरिहार्य आहे. पूर्णपणे अपरिहार्य. तर, हृदये दोन प्रकारची आहेत. एक आळसवाणे हृदय. दुसरे कार्यान्वित हृदय. भविष्यवादी माणसाचे हृदय कार्यान्वित असते आणि त्याला हृदयविकाराचा मोठा झटका येतो आणि आळसवाणे हृदय असणा-या माणसाला अंजायना होते. तर सर्व रोग मानसिक, भावनिक किंवा शारिरिक, चक्रांमधील गडबडींमुळे होतात.

**श्रीकृष्णाची पुजा - मद्रास** **9 फेब्रुवारी, 90**

अतिशय लहान उगमापासून याची सुरूवात झाली, आणि नदीप्रमाणे याचा मोठा प्रवाह झाला. अशा जीवनावश्यक रितीने सहजयोग आपण इथे प्रस्थापित करु शकलो, याबद्दल मला अतिशय आनंद झाला आहे. ईश्वराने त्याचे काम करण्यासाठी वेचून घेतलेले लोक तुम्ही आहांत हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. प्रथम आणि आद्य कार्य, हे त्याच्यासाठी कार्य करणे मग तो तुमच्यासांठी कार्य करतो. तो तुमची काळजी वहातो. तुमचे सर्व वैयक्तिक प्रश्न, सामाजिक प्रश्न आणि इतर प्रश्न सोडविले जातात. जे सर्व गोष्टी देवाच्या हवाली करतात व त्यांचे प्रश्न अत्युत्तमरित्या सोडविले जातात. ही परमचैतन्याची शक्ति आहे, जो आपले पोषण करते, आपल्याला मार्गदर्शन करते, आपली काळजी वहाते व सर्व काही संघटीत करते. एखादी गोष्ट व्हावी याची तुम्ही अपेक्षा करत नसतांनाही ती सहज होऊन जाते. सहजयोग कांही लोकांमध्ये वाढायला वेळ लागतो. तेव्हां धीर ठेवा आणि स्वतःबद्दल पूर्ण विश्वास ठेवा.

आपण जर ईश्वराच्या अक्षयत्वाशी निगडीत झालो आहोंत, तर कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता कां करावी? सर्व कांही इतक्या सुरेख पध्दतीने घडून येते, पण पहीली गोष्ट म्हणजे आपण आपल्यामध्ये विश्वास ठेवला पाहीजे, आपले हृदय निर्मळ असेल, ईश्वराविषयी आपल्यामध्ये मनापासून प्रेम असेल तर ईश्वराचे तुमच्यावर त्याहून अनेक पटीने प्रेम असते, यावर आपण विश्वास ठेवला पाहीजे. पण हे वेगळ्या प्रकारचे प्रेम असते, तुमच्यावर प्रेम करणा-या पित्याप्रमाणे. तुम्ही चूक केली तर ते ती सुधारतात. त्याप्रमाणेच परमचैतन्यसुध्दां तुम्हांला सुधारते. ते तुम्हांला अशाप्रकारे सुधारते कीं तुम्हांला तुमची शिकवण मिळते. त्यामुळे सदासर्वदा आपण हे लक्षांत ठेवले पाहीजे कीं, ती महान शक्ति, जिला आपण परमचैतन्य म्हणतो त्याचेच आपण सार-सारांश आहोत. आतां परमचैतन्य कार्यान्वित झाले आहे. सर्व मानवजात चांचणीपध्दतीने शिकत आहे. पण आतां ते पूर्णपणे कार्यान्वित झालेले परमचैतन्य आहे.

आधुनिक युगामध्यें "देवी" हा शब्द त्यांनी त्यांच्या स्वतःसाठी वापरला आहे, हे सुध्दां इतके स्पष्ट आहे हे फक्त कलियुगांतच शक्य आहे. त्याची प्रतिक्रिया म्हणून कांही लोक सत्याच्या विरोधांत जाऊ लागले आहेत आणि अध्यात्म खोटे आहे असे म्हणून दुसरे टोक गांठण्याचा प्रयत्न करीत आहेत. या दोन प्रतिक्रियांच्यामध्ये उभे आहे, "सत्य" आतां काय होणार आहे, कीं सारासार विचारसुध्दां मर्यादित आहे, हे त्यांना समजेल. तर्कबुध्दी कशाच्याहीकरितां वापरतां येते. समजा, कोणीतरी कोणाचा खून केला, तुम्ही त्याला युक्तिवादाने पटवून देऊं शकतां. कांहीही तर्कबुध्दीने पटविता येते. त्यांत "मानवता" नसते. आतां कलियुगांत आपल्याला ही चांगली संधी आहे, कारण अतिशयोक्तिच्या रहाणीमानामुळे उद्भवलेले प्रतिकूल परिणाम लोक बघूं शकतील.

आपण एका मोहजालांत आहोत आणि आपल्याला त्या मोहजालापलिकडे गेले पाहीजे. हे जेव्हां होईल तेव्हां आपण सहजयोगामध्ये येऊं लागतो. यामुळें परिपक्वता साध्य होते. जी तुम्हाला परिपक्व करते, त्या कलियुगाच्या आगीप्रमाणें तो आहे. योग परिषदेसाठी दोन दिवस मला रशियाला जावे लागले. माझ्या यजमानांनी मला विचारले, "या दोन दिवसांत, तूं काय साध्य करणार आहेस?" योगा परिषदेमध्ये सर्व "इस्टर्न ब्लॉक"च्या देशांतील प्रतिनिधी रूमानिया, हंगेरीया, पोलंड इत्यादि होते आणि त्यांना त्यांचा साक्षात्कार मिळाल्यावर नाटयमय परिवर्तन होऊ लागले. तेव्हा एका माणसाला आत्मसाक्षात्कार मिळाला तरी वातावरणांत बदल होतो.

"ईश्वर तुम्हां सर्वांना आशिर्वादित करो".

महिषासुर-मर्दिनी पुजा - बंगलोर 13 फेब्रुवारी 1990

प्रथम प्रत्येक जागेमध्ये माणसाला श्री गणेशाची स्थापना करावी लागते. तुम्हांला माहीत आहेच की गणेश हे मांगल्य, पवित्र्य अबोधिता याचे स्त्रोत {उगमस्थान} आहेत. या तिन्ही गोष्टी श्री गणेशाच्या सुज्ञपणामधून येतात. तेव्हा पहिला आणि आद्य हा तुमच्यामधील सुज्ञपणा आहे. मांगल्य काय, पवित्र्य काय हे तुमच्यामधील सुज्ञपणामुळे कळेल. हा सुज्ञपणा हा जगांतील हुशारीचा शहाणपणा नव्हे. पण दैवी सुज्ञता आहे, जी आपल्या प्रगतीबरोबर आपल्याला कळते. तेव्हां आपल्या सुज्ञपणाचा स्त्रोत आपल्यामध्ये प्रस्थापित करणे, हे प्रत्येक सहजयोग्याचे कर्तव्य आहे.

आतां सहजयोग्यांसाठी या सुज्ञपणाचे उगमस्थान म्हणजे परमचैतन्य किंवा शुध्द चैतन्यलहरी याच आहेत. जेव्हां जेव्हां तुम्हांला अडचण असेल किंवा ज्यावेळी तुम्हांला बाधा जाणवतील, किंवा जेव्हां तुम्हाला हे स्वीकारावे की ते, हे चांगले आहे, की ते चांगले आहे असे वाटेल तेव्हा सुज्ञपणाची पहीली गोष्ट म्हणजे व्हायब्रेशन्सवर त्याची परिक्षा करावी. कारण आपल्याला नवीन जाणीव मिळाली आहे हे आपण नेहमीच विसरतो. आपण उच्चतर लोक आहोत हे आपण विसरतो. आपण संत आहोत हे आपण विसरतो आणि देवाने आपल्याला सतत राहाणारी एक विशेष जाणीव दिली आहे. निर्णय घेण्याची आपली स्वतःची पध्दती जेव्हा आपण वापरतो तेव्हा आपण चूक ठरतो. व्हायब्रेशन्स ही एकच गोष्ट आहे जी तुम्हांला सांगू शकेल कीं तुम्ही जे कांही करीत आहात ती गोष्ट बरोबर आहे किंवा नाही. ही सवय वृध्दींगत करण्यांत सुज्ञपणा आहे. भावनिक किंवा मानसिक पातळीवर कोणत्याही गोष्टीचा निर्णय घेण्याची तुमची आधी असलेली सवय नाही. कांही लोक नेहमी म्हणतात, "मला फार चांगले वाटले." हा एक मानसिक दृष्टीकोन आहे. कांही लोक असे म्हणतात, तात्विक दृष्ट्या मला वाटले ते तसे असावे. आपल्या-सांठी फक्त एक स्त्रोत आहे. तो म्हणजे परमचैतन्य किंवा व्हायब्रेशन्स आणि त्यांना समजून घेणे.

पहिला सुज्ञपणा म्हणजे व्हायब्रेशन्सच्या प्रामाणिकपणावर पूर्णतया अवलंबून आणि दुसरा म्हणजे तुमच्या व्हायब्रेशन्सची स्थापना. त्या जर व्यवस्थित नसतील. जर त्या नीट समजत नसतील तर तुम्हाला मानसिक अथवा भावनिक रित्या निर्णय घ्यावा लागेल. पण जर तुम्हांला व्हायब्रेशन्स आहेत आणि तुम्हांला त्यांची जाणीव आहे तर हे योग्य की अयोग्य हा निर्णय घेणे फारच सुलभ आहे.

तिसरी गोष्ट प्रत्येकाला समजली पाहिजे ती ही, कीं, आपण देवाच्या साम्राज्यांत प्रवेश केला आहे. हा अंधविश्वास नव्हे. कारण तुम्हांला थंड वाऱ्याची जाणीव झाली आहे. परमचैतन्याची तुम्हांला जाणीव झाली आहे. ते कार्यान्वित होईल. समजा मी कुठे जात असले आणि ड्रायव्हर म्हणाला, आपला रस्ता चुकला आहे, मला शांत वाटते. मला या रस्त्याने गेले पाहीजे. मला पॉझिटिव्ह असले पाहीजे. जर तुम्ही सर्व कांही परमचैतन्यावर सोपविले तर इतक्या लोकविलक्षण गोष्टी घडून येतील. तुम्हाला आश्चर्य वाटेल. कशाप्रकारे आपले प्रश्न सोडविले जातात. कशाप्रकारे आपल्याला मार्गदर्शन केले जाते. तुम्हाला इतके व्यवस्थितपणे सर्व दिसते. तुम्ही कांहीतरी

करू इच्छिता, त्यासांठी झगडत असतां, आणि तुम्ही नुसते म्हणतां, "आतां मी सगळं सोडून दिलं आहे. आणि ते घडतं. पण तेच तुम्हाला कांही करायचे असेल, तर हे परमचैतन्य म्हणते, ठीक आहे. व्हा पुढे, आणि करा. तुम्हाला घडवायचे आहे तर घडवा. तुम्हांला तुमच्या स्वतःच्या प्रयत्नाने करायचे आहे तर करा. तर हे तुमच्या वागण्यांतून हळूहळू लुप्त होते. आणि मग सगळे लोक मला सांगतात, "श्री माताजी, तुमच्या कृपेनं मला हे मिळाले आणि ते मिळाले.

चौथे शहाणपण हे की तुम्हांला पूर्णपणे शरण गेले पाहीजे. आणि सहजयोगाबद्दल तुम्हांला दृढ विश्वास पाहिजे. सहजयोगामध्ये तुमची गहनता किती आहे ही एक महत्वाची गोष्ट आहे. तुमच्यामध्ये ती गहनता असली तर ते कार्यान्वित होते. घडून येते. कारण शेवटी तुम्हाला तुमचे आईवडिल, तुमचे कुटुंब, तुमची मुले आणि तुमचे प्रश्न असतात. पण हे प्रश्न सोडविण्यासांठी तुम्हांला कष्ट करावे लागत नाहीत. कष्ट करावे लागतात ते फक्त तुमचे व्हायब्रेशन्सचा विकास करण्यासांठी. आतां तुम्ही ते कसे वाढविता? तुम्हांला निर्विचार बनले पाहिजे. निर्विचार झाल्याशिवाय तुम्ही ते घडू देऊ शकत नाही. तुम्ही माझ्या फोटोसमोर बसले असाल आणि विचार येत असले तर तुम्ही निर्विचाराचा मंत्र म्हटला पाहिजे. "ओम त्वमेव साक्षात, निर्विचार साक्षात....." निर्विचाराची स्थिती प्रस्थापित केली पाहीजे. अशाप्रकारे तुमच्या मनाची गहनता वाढेल.

त्यानंतर तुमच्यापुढे दुसरा प्रश्न असतो. तुमच्या हृदयाची गहनता कशी वाढवावी? ध्यानाला बसण्यापूर्वी तुम्हांला असे म्हटले पाहीजे, "श्री माताजी, कृपा करून माझ्या हृदयात या". मग ध्यानाला बसा आणि तुमचा हात तुमच्या हृदयावर ठेवा. कांही लोक नुसते असेही म्हणू शकतात, "श्री माताजी मी आत्मा आहे. पण सर्वोत्तम गोष्ट म्हणजे, "श्री माताजी, माझे हृदय उघडा" असे म्हणणे. हृदयाचे उघडणे हे फार महत्वाचे आहे. तुमचे हृदय उघडल्याशिवाय तुमची प्रगती होत नाही. मला कांही नको, मला फक्त विशाल हृदय हवे. तुमच्या स्वतःच्याकडे तुमचे हृदय उघडे करा. पूर्ण वेळ तुमच्या स्वतःबद्दल इतकी काळजी करू नको. काही वेळां लोक त्यांचा कठोर स्वभाव किंवा कडकपणा किंवा त्यांची शिस्त याबद्दल लेली मिरवतात. "मी चार वाजतां उठलो, स्नान केले, त्यानंतर ही पुजा केली वगैरे वगैरे. हे सर्व तुमचे हृदय मारून टाकेल. सहजयोगामध्ये कोणीही त्यांच्या शिस्तीबद्दल बढाया मारतां नये. हे तुम्ही स्वतःच्या समाधानासांठी करतां. ध्यानसुध्दां तुम्ही स्वतःच्या समाधानासांठी करतां, कोणत्याही प्रकारच्या मोठया तपस्येसाठी नव्हे. फक्त आनंदासाठी.

खूप आनंदी मनस्थितीत तुम्ही सकाळी उठतां. आंघोळ करतां, दिवसाची सुरुवात करतां. तुम्हाला क्रूरतेने स्वतःला शिस्त लावायची नसते. पण तुम्हांला स्वतःवर प्रेम केले पाहिजे आणि स्वतः आनंद उपभोगला पाहिजे. माझी पूजा करणा-या लोकांना मी पाहीले आहे. ते फार आनंदी मनःस्थितीमध्ये असतात. गाणी म्हणत माळा करण्याचा आनंद लुटत असतात. दुसरा प्रकार, एकसारखी शिस्त लावित, हे करू नका, ते करू नका असे म्हणत पूर्ण वेळ विचार करीत, श्री माताजी येणार आहेत, वेळ झाली आहे हे आणि ते पुजा ही कांही कुठल्या

प्रकारचा समारंभासाठी नव्हे. ते तर फक्त आपल्या प्रेमाच्या आनंदामध्ये भिजून चिंब होणे आहे. तेव्हां घाई करण्याची किंवा काळजी करण्याची गरज नाही. तुम्ही इथे काय ठेवले आहे, तिथे काय केले आहे, ते मी पाहात नाही. तुमच्या प्रेमामुळे तुम्ही ते केले आहे. तुम्ही जे कांहीं करता त्यांमध्ये मी कधी चूक बघत नाही तुम्ही जे कांही करतां ते सुंदर असते. तुम्हांला वृध्दा शबरी विषयी माहीत आहे ना, तिने कांही बोरे गोळा केली आणि त्यांपैकी प्रत्येकाची तिच्या दातांनी तोडून चव घेतली. जेव्हां श्रीराम आले, तेव्हा तिने म्हटले, "कृपावंत होऊन हे खा. तुम्हांला आंबट गोष्टी आवडत नाहीत, म्हणून मी त्या सा-यांची चव घेऊन पाहीली आहे. आणि गोड असलेली तुमच्यासांठी ठेवली आहेत." पण लक्ष्मण वेगळ्या प्रकारचा होता. तो रागावला, कीं, या खालच्या जातीच्या स्त्रीने रामाला अशाप्रकारे अर्पण करावे, याउलट श्रीरामांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि त्यांनी ती खाण्यास सुरुवात केली. ते म्हणाले इतकी चवदार आणि गोड बोरे मी कधीच खाल्ली नाहींत. सीताजींना सगळे समजले आणि त्या म्हणाल्या, "मी काही घेऊ शकते का? त्यांनी ती खल्ली आणि जणू "अमृत" असे त्यांचे वर्णन केले. तेव्हा लक्ष्मणाने कांही मागितली. तेव्हा सीताजींनी म्हटले, "तुम्ही इतके रागवलां होता तर तुम्हांला कांही मिळणार नाही. तिच्या विनविण्या करुन त्यांनी सुध्दां कांही खल्ली आणि ती गोड आहेत असे त्यांना जाणवले. अत्यानंद म्हणजे प्रेमाचा दाखला होय.

सगळे कांही प्रेमाने केले पाहिजे, सुरेखपणे आणि हळुवारपणे, सगळे कांही गोडव्याने केले पाहीजे. गोडवा किंवा माधुर्य नसेल तर पूजा आनंदमय होणार नाही. जसे आहे त्याप्रमाणे, नेहमीच मला तुम्हांला सांगावे लागते हे करा आणि ते करा असे. गंभीर असे कांहीच नाही आणि पुरुष सगळं काही संघटीत करुं पाहातात. त्यांना समजत नाही. सगळे काही व्यवस्थित झाले तर ते आनंददायी नसते. एखादी कुतुहलजनक घटना पाहीजे. कांही चुका, ज्या नाटकांत भर घालतील. सगळं काही इतक्या गंभीरपणे करायला नको. सगळे कांही अगदी व्यवस्थित आहे. आपण कसेही असलो, काहीहो असलो तरी प्रेमांत आहोत. प्रेमामध्ये बाकी सगळे कांही तुम्ही विसरतां. महत्वाची गोष्ट फक्त प्रेम हीच आहे. ही जर परिस्थिती असेल तर आपण खरोखर सगळ्याचा आनंद उपभोगतो. शहाणपणाचा उच्चांक म्हणजे सहजयोगात आपण आनंद उपभोगतो आहे किंवा नाही? ही खरी कसोटी आहे. कीं आपल्याला तो जास्त भारी किंवा कठीण वाटतो आहे? जर आपल्याला तो सुखदायी असेल तर माझे काम झाले आहे. सगळ्या गोष्टींचा आनंद तुम्हाला उपभोगता यावा म्हणून मी काम करते. प्रत्येक छोटी गोष्ट, प्रत्येक गोष्ट जी तुम्हाला सुंदर दिसते तिचा आनंद तुम्ही लुटावा.

सहजयोग फुलाप्रमाणे आहे. तो सुगंधाने भरलेला आहे. मी जेव्हां त्याला पाहाते तेव्हां माझे हृदय भरुन येते. आनंदी, सुखी, प्रामाणिक आणि इतके चांगले लोक पहाणे किती छान आहे, असे दृश्य कुठे दिसते? श्री गणेशाप्रमाणे, जो मुलाप्रमाणे आहे, नाचत आपल्याला आनंदित करीत आणि आपल्याला सूज्ञ करीत. छोटयाशा मुलामध्ये इतके महान व्यक्तिमत्व. अक्षय बालपणाचे ते मूल आहे. त्यामुळे श्री गणेशाचे ते सौंदर्य आपण प्रस्थापित

केले पाहीजे. तुम्ही मुलांना पाहातां, ते खेळण्यावरोबर खेळतात मग ते फेकून देतात. त्यांना कसल्याच बाधा होत नाहीत. मुलांना जर असे वाटले हे माझे आहे तर ती मुले नसतात. कांहीच इतके महत्वाचे नाही. अशाप्रकारे तुम्हाला सहजयोग समजायला हवा.

प्रथमतः आपल्याला समजायला हवे की आपण देवीला प्रसन्न ठेवले पाहिजे. ती आनंदात असेल तर इतर देवता खूष होतील. फक्त एक गोष्ट मला आनंदात ठेवते. तुम्ही सर्व एका कुटुंबात, एकमेकांवर प्रेम करतांना मला आढळतां. समजुतदारपणा आणि प्रेम यांपासून झालेली जवळीक.

ईश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो.

## अहमदाबाद प्रोग्रॅम - संक्षिप्त  15 फेब्रुवारी 1990

जेव्हां आपण अज्ञानांत असतो, अंधःकारात असतो आणि सत्याची कल्पना करत असतो, त्यावेळी ती कल्पना आपले संस्कार आणि बुध्दी यांना अनुसरून केलेली असते.

कुंडलिनी व तिचे उत्थान याविषयी बोलतांना श्री माताजी म्हणतात, " ब्रम्ह, ही सूक्ष्म शक्ति आहे आणि ही कुण्डलिनी जेव्हां याचे छेदन करते त्यावेळी ती ब्रम्हाच्या आंतही छेदन करते म्हणजे समजा, ब्रम्हाची जी सूक्ष्मशक्ति आहे तिला स्पर्श करते. पहिल्यांदा आपल्याला मिळाली ती जडशक्ति. आणि या जडशक्तिला भेदून ती ब्रम्हाला स्पर्श करते". यानंतर श्री माताजींनी मानवामधील कुंडलिनीचे स्थान तिन्ही नाडया त्यांची कार्ये याविषयी माहीती देऊन म्हटले की, " आपल्याला सदैव संतुलनांत राहीले पाहीजे. आणि संतुलनांत राहाण्यासांठी सहजयोगा-शिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. आपण म्हणतो आपण संतुलनामध्ये आहोत. ब-याच लोकांना वाटते, आपल्यामध्ये खूप विचार येतात. त्यांना आपण कसेही करून बंद करावे. त्याला कांही इलाज नाही. कांही लोक म्हणतात, आमच्यामध्ये खूप अहंकार भरला आहे. त्यालासुध्दां काही उपाय नाही. तुम्ही जर अहंकाराबरोबर झगडूं लागला तर अहंकारही तुमच्याबरोबर झगडूं लागेल. याचा उपाय हा आहे की आपल्यामध्ये कुंडलिनीचे जागरण करून घेणे.

सारी सृजनशक्ति स्वाधिष्ठान चक्रामधून आपल्याला मिळते. जास्त करून गुजरातमध्ये मी पाहिजं कीं लिव्हरचे त्रास खूप जास्त आहेत कारण गुजरायमध्ये फरसाण वगैरे तळलेल्या गोष्टी खूप खातात आणि तळलेल्या गोष्टी खाल्यामुळे माणसाला त्रास होतो. शेंगदाणे आपण आवश्यकतेपेक्षां जास्त खातो. शेंगदाण्याच्या तेलामुळेसुध्दां लिव्हर खराब होते आणि तेलांचे ब्रँड मी असे पाहीले आहेत जे खाल्यावर कोड येतो. (ल्युकोडमो होतो) हा सुध्दा गुजरायेत जास्त होतो."

हल्ली आपल्यामध्ये लयबध्दता उरली नाही. हे जे धावपळीचे जीवन आहे त्यांत माणसावर खूप ताण राहात नाही आणि यामुळे आपल्यामध्ये कशाचाही सहज परिणाम होइल अशी स्थिती येते आणि एक रोग रक्ताचा

कॅन्सर होतो. ज्यातून वाचण्याचा उपाय आहे सहजयोग. त्याचे कारण आम्हाला माहीत नाही. आम्ही काही करत नाही. पण तुमच्या मधील कुंडलीनीचे जागृण करा. तुटलेले चक्र पटकन जोडले जाते. आणि कुंडलिनी त्याला आपली शक्तिसुध्दा देते.

तिसरे चक्र नाभी याची शक्ति अशी आहे की प्रत्येक गोष्टीला स्वाहा करू शकते की मानवामध्ये जे दहा धर्म आहेत जसे कार्बनच्या चार व्हॅलन्सीज त्याप्रमाणे आपल्या दहा व्हॅलन्सीज आहेत. या दहा धर्मातील एका पासूनही जर आपण च्युत झालो तर हळूहळू आपल्यामध्ये त्रास सुरु होऊ लागतो. या त-हेने पोटामध्ये त्रास होऊ लागतो. जेव्हा पोटात त्रास होतो तेव्हा आपण विचार करतो हे औषध घ्यावे, नाहीतर ते. पण ही औषधाने ठीक होणारी गोष्ट नाही. त्या धर्माला आपण पण त्यामध्ये स्थापन केले पाहीजे. आणि ते करण्याची पध्दत म्हणजे कुंडलिनीचे जागृण. ज्यामुळे सगळे धर्म ठीक होतात. वाईट सवयी सहजयोगाने सुटतात कारण आपण स्वतः शक्तिशाली होतो. कोणाची गुलामी करीत नाही आणि अनेक नुकसान पोहोचवणा-या सवयी सुटतात.

अनाहतचक्र. यामध्ये स्टर्नममध्ये देवीचे गण {अँटीबॉडीज} तयार होतात. बारा वर्षाच्या वयामध्ये त्या पुर्ण शरीरामधे पसरतात आणि ज्यावेळी कोणी बाहेरची शक्ति आक्रमण करते त्यावेळी हे गण तोंड देतात आपले मध्य अनाहत जर कमजोर असेल जसे ब-याचशा बायकांना आपल्या पती बद्दल आशंका असते तेव्हा ब्रेस्ट कॅन्सर होतो.

विशुध्दी म्हणजे श्रीकृष्णाचे सोळा पाकळ्यांचे चक्र. याच्या चलनामुळे आपले डोळे, नाक, कान, तोंड चालते. आता जो माणूस जास्त बोलतो, आपल्या बोलण्याने दुस-यांना रागवत, ओरडत राहतो. त्याचे हे चक्र नेहमी पकड घेते. किंवा जो माणूस सदैव आपल्याला दोषी समजतो, मी हे पाप केलं, ते पाप केलं, त्याचे हे अलीकडचे चक्र खराब असते.

जर मेंदूचा ट्रन्सव्हर्स {आडवा} सेक्शन घेतला तर ब-याच पाकळ्या दृष्टीस येतात. डॉक्टरांचे म्हणणे आहे या 980 किंवा 988 आहेत. आम्ही त्यांना 1000 म्हणतो. त्यासाठी याला सहस्त्रार म्हणतो. जेव्हा कुंडलिनीचे उत्थान होते त्यावेळी या सहस्त्राराचा फार थोडासा भाग वापरात येतो,प्रकाशित होतो. जेव्हा प्रकाश वाढू लागतो तेव्हा आपल्या मेंदूमधील या शक्ती जागृत होतात. ब-याच लोकांची बुध्दी खुपच "द्रष्ट" होते. हृदयही इतके मोठे होते की असा मनुष्य महान अंतकरणाचा, खूप शहाणा म्हणून मानला जातो. जेव्हा कुंडलिनी ब्रम्हरंध्र छेदते त्यावेळी पसरलेल्या सर्व शक्तीला ती एकत्रित करते आणि आपल्यामध्ये ही शक्ती आपल्या हातातून वाहण्यास सुरुवात होते. सर्व प्रथम आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरच आपल्याला ह्या शक्तीचा आपल्यामध्ये बोध होतो. हा बोध, याला समजणे हेच "वेद" आहेत- यापासून वेद हा शब्द निर्माण झाला. आणि यानंतर आपण स्वतः पाहतो की आपल्या डोक्यामधून थंड थंड वारा निघतो. आणि छायाचित्रात सुध्दां कधीकधी प्रकाशसुध्दा

यातूनही दिसतो. तर, या परमचैतन्यात सुध्दा प्रकाश आहे. तो सुध्दा दिसतो. आणि अशा अनेक गोष्टी दिसतात. ज्या आपण विचार करतो अस्तित्वात नाहीत त्या समोर दृष्टीगत होतात. आपण बुध्द महावीर, जीझसक्राइस्ट सर्वांना मानतो. पण अजून त्यांच्याशी संबंध आला नाही.

कॉम्प्यूटरप्रमाणे या चैतन्यलहरींनी सत्य काय व असत्य काय हे आपण जाणू शकाल. या सर्व गोष्टी आपल्यामध्ये आहेत, ह्यांचे प्रकटीकरण व्हायचे आहे, त्यांना आकारात यायचे आहे. हळूहळू या शक्त्या प्रबल होत जातात. आणि आपण नेहमी आनंद सागरामध्ये रहातो. आणि अनेक प्रकारे आपल्याला मदत मिळते. जेव्हा लक्ष्मीतत्व जागृत होते त्यावेळी पैशाची अडचण मिटते. जेव्हा सरस्वतीतत्व जागृत होते त्यावेळी प्रबलता, बुध्दीची तीक्ष्णतासुध्दा आपल्याला मिळते. इतक्या सर्व शक्त्या जागृत होऊन सुध्दा आपण अत्यंत नम्र, अत्यंत प्रेममय, अत्यंत सामुहिक बनता. फक्त स्वतःचाच विचार करीत नाही. सा-या दुनियेचा विचार करवा लागतो, आणि आपण जी इच्छा करता ती पूर्ण होते. फार आश्चर्याची गोष्ट आहे, की लोक जेव्हा सहजयोगामध्ये येतात, तेव्हा म्हणतात, "माताजी, हे कसे काय घडले ? हे कसे प्राप्त झाले ? हे परमचैतन्य आहे. हे आता आपल्याला पाहाते, सांभाळते. कारण आपण परमात्म्याचा साम्राज्यामध्ये आहात. परमात्म्याचे साम्राज्य एका परीने कमालीचे साम्राज्य आहे. कोणत्याही गोष्टी कशाचीही उणीव त्यामध्ये सापडणार नाही. हो पण आपण गहनामध्ये असले पाहिजे. आपल्यामध्ये गहनता असली तर सर्व कार्य होणार आणि हा चमत्कार नाही, ही वास्तीवकता आहे. आपण याला जाणले नाही म्हणून आपण याला चमत्कार म्हणता.

जशा आपल्याला एकेक वस्तू दिसू लागतात, आपल्याला मिळू लागतात. आणि तसे पाहायला गेले तर आपण स्वतःसुध्दा एक चमत्कारच आहात. आपण आपल्याबद्दल सगळे जाणता. आणि हळूहळू परमात्म्याबद्दल सुध्दां जाणाल. आणि याप्रकारे आपली प्रगती होत राहील.

महाशिवरात्री पुजा पुणे

दिनांक : 23/2/90

**श्री माताजींचे भाषण -**

आज शिवरात्री आहे. आणि आम्ही आज शिवाचे पूजन करणार आहोत. बाहेरील गोष्टीत आपण आपले शरीर व त्या संबंधीच्या अनेक गोष्टी, मन, बुध्दि, अहंकार आदि गोष्टींना चालना देत असतो. त्यावर प्रभुत्व मिळवू शकतो. त्याचप्रमाणे ज्या काही अंतरिक्षांतील गोष्टी आहेत. त्याही आम्ही ओळखू शकतो व त्याचा उपयोग करूं शकतो. त्याचप्रमाणे या पृथ्वीमध्ये जे गुप्त तत्व आहे आणि या पृथ्वीत जे निर्माण झाले आहे ते सर्व आम्ही उपयोगांत आणूं शकतो. त्याचे सारे प्रभुत्व आम्ही आमच्या हातावर घेऊ शकतो. परंतु हे सर्व बाहेरचे आवरण आहे. आम्ही आंतमध्ये आहोत. जो आमचा आत्मा आहे तो शिव आहे. बाहेरील सर्व गोष्टी नश्वर आहेत. जो जन्म घेणार त्याला मरण आहेच. जो उत्पन्न होतो त्याचा विनाश होतोच. परंतु आत्म्याच्या आतमध्ये जो आत्मा आहे, जो शिव आहे तो त्या सदाशिवाचे प्रतिबिंब आहे. तो अविनाशी, निष्काम व स्वच्छंद आहे. तो कोणत्याही गोष्टीस लिप्त नाही. तो निरंजन आहे. त्या शिवाची प्राप्ती झाल्यावर आम्ही त्या शिवाच्या प्रकाशांत चमकूं लागतो. आम्ही हळूहळू संन्यास घेऊ लागतो. बाहेरचे आवरण जसेच्या तसेच राहाते. परंतू आंतमध्ये जो आत्मा आहे तो अचर, अतूट व अविनाशी आहे. तो नेहमी आपल्याच ठिकाणी असतो. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर आमचे जीवन हे भव्य, दिव्य व पवित्र असे जीवन बनते. म्हणून मनुष्यमात्रासाठी आत्मसाक्षात्कार मिळविणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय मानवात संतुलन येत नाही. त्यामध्ये खरे प्रेम निर्माण होत नाही व त्यामध्ये खरी सामुहिकता येत नाही व त्याला सत्याची ओळख पटत नाही. ते सारे ज्ञान शुध्द ज्ञान होऊन जाते. जिला आपण विद्या म्हणतो. ती फक्त या आत्म्याच्या प्रकाशातच ओळखता येते. जेव्हा मनुष्य आत्म्याच्या प्रकाशात उजळून निघतो तेव्हा त्याची दृष्टीही निरंजन होऊन जाते. तो फक्त बघत असतो. कोणतीही वस्तू पाहिल्यावर त्यामध्ये कोणतीही प्रतिक्रिया उमटत नाही. तो फक्त पहातो व पाहिल्याबरोबर त्याला त्या वस्तूचे पूर्ण ज्ञान होते. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर जो पूर्ण एकरूप होत नाही तो नेहमी स्वतःबद्दलच विचार करीत असतो. मी आज कोणते जेवण घेऊ? कोणाच्या घरी चांगले जेवण मिळाले होते? आज कोणी आमची जेवायची सोय करील काय? आज कोठे जेवायला जायला पाहिजे? याचाच तो विचार करीत असतो. कोणत्या ठिकाणी माझे स्वागत होईल? कोणत्या ठिकाणी लोक मला मान देतील? कोणत्या सभेला जाऊन मला मान मिळेल? दुसरा माणूस असा विचार करील की, कोणते काम केले म्हणजे मी खूप पैसा जमवू शकेल? माझेजवळ खूप पैसे येऊ शकतील. जगातील सर्व संपत्ती मी मिळवीन व सर्व जगाला मी ठीक करील. तिसरा मनुष्य असा विचार करील की, मला किती मुले आहेत? व त्यांच्यासाठी मला काय करायला पाहिजे. तसेच त्या मुलांच्या मुलासाठी मला काय करायला पाहिजे. तसेच माझे नातेवाईक आहेत त्यांचेसाठी मला काय करायला पाहिजे? अशाप्रकारचे विचार जो करीत असतो त्याचे फक्त स्वतःकडे लक्ष

असते. चौथा माणूस असा विचार करील की, मी कोठे आहे ? समाजामध्ये माझे स्थान कोठे आहे ? एखाद्या गोष्टीपासून मला काय फायदा मिळणार आहे ? मी आज कोणते कपडे घालू ? आज मी कोणाला कशाप्रकारे प्रभावित करू ? मी आज कोणती गोष्ट करू की, जीच्यामुळे सगळे लोक आश्चर्य करतील. मी आज कोणती युक्ति शोधुन काढू की जीच्यामुळे मी खूप मोठा हुशार माणूस आहे असे लोक म्हणतील. दुसरा जो आहे तो माणूस सर्वासमोर नम्रतापूर्वक पुन्हा पुन्हा लवून नमस्कार करील कारण मी फार नम्र आहे. मी सगळ्यांशी आदराने वागतो. मी सुसंस्कृत आहे असे त्याला दाखवायचे असते. कोणी तिसरा माणूस असे म्हणेल की, मी विद्वत सभेमध्ये जाऊन वादविवाद करीन. मी खूप पुस्तके वाचीन त्यामुळे माझी बुध्दि प्रगल्भ होईल. मी असा बुध्दिमान होईल की, "हा किती मोठा लेखक आहे, किती मोठा वक्ता आहे." असे लोक म्हणू लागतील. अशाप्रकारे दुसरा कोणी आपल्या संगीताचे बाबतीत विचार करतो. कोणी आपल्या कलेबाबत विचार करतो. तर कोणी उद्याच्या गोष्टीबद्दल विचार करीत असतो. प्रत्येक बाबतीत मनुष्य स्वतःबद्दल विचार करीत असतो की, माझी प्रगती कशी होईल त्यापासून मला काय मिळेल ? बरीच माणसे समाजकार्यही करतात. ज्याप्रमाणे एखाद्या बुडणा-या माणसाला वाचविण्या साठी एखादा पाण्यात उडी घेतो तेही त्याच्या आतमधे मी आहे हे जाणूनच. माझ्यामध्ये मी आहे तसा त्या बुडणा-या माणसामध्येही आहे हे समजल्यामुळे तो त्याला वाचवितो. त्यापेक्षाही छान काम मनुष्य करीत असतो. तो आपल्या देशासाठी फार त्याग करीत असतो कारण हा माझा देश आहे. माझा देश सुखी व्हायला पाहिजे या विचाराने त्याच्यामध्ये शून्यता येऊ लागते. महानता येऊ लागते. दुसरा एखादा असा विचार करील की, माझी जी कला आहे ती अशा रितीने विकसित व्हावी की सा-या जगात माझ्या देशाचे नाव व्हावे. अशा रितीने मनुष्य स्वतःला सामुहिकतेमध्ये आलेला पाहून खूष होतो. परंतु या सर्व गोष्टीत मला विजय प्राप्त व्हावा ही अपेक्षा असते. माझे यश पाहून लोकांनी आपली वाहवा करावी ही गोष्ट अपेक्षित असतेच. त्यामुळे तो सुख आणी दुःखाच्या फे-यात फसून जातो. आपले नाव चोहिकडे छापले जावे, लोकांनी आपला मानसन्मान करावा अशी त्याची अपेक्षा असते. कोठेही गेलो तरी लोकांनी आपला आपमान करू नये, कोणीही आपणास कमी लेखू नये. एखादा कितीही मोठा संयोजक असला व तो आत्मसाक्षात्कारी नसला तर त्याच्यामध्ये मीपणा (अहंकार) येतो. त्याचे कार्यक्षेत्र कितीही मोठे झाले तरी त्याचे चित्त अहंकारावरच केंद्रित होते. त्याच्या कार्याकडे त्याचे लक्ष जात नाही.

परंतु जर आपण आपल्या आत्म्याशी एकरुपता प्राप्त केली तर आपण वेगळ्या पध्दतीने विचार करु लागतो. प्रत्येक गोष्टीचा उपयोग समाजासाठी कसा होऊ शकेल, जगासाठी कसा होऊ शकेल याचा अंतरिक विचार करु लागतो. अशा लोकांसाठी काय करता येईल याबद्दल सर्व विचार आपल्यामध्ये बदल घडवितात. एखाद्या झाडाकडे लक्ष गेल्यास परमेश्वराने किती सुंदर वृक्ष बनविला आहे असे विचार मनात येतात. मी ही असा सुंदर असतो व सावली देणारा असतो तर कितीतरी लोक माझ्या सावलीत येऊन बसले असते. परंतु मी असा नाही. मी सुध्दा असा सुंदर व्हायला पाहिजे. त्या झाडाची स्तुति करताना तो गाण्यात मग्न होतो.

हिमालय समोर दिसला तर हिमालयाची स्तुति गात राहील. परंतु जो आत्मनिष्ठ नसतो, जो मनुष्य आपल्या आत्म्याला ओळखत नाही तो नेहमी स्वतःचीच स्तुति करीत असतो. मी हिमालयावर गेलो होते. मी तेथे अशाप्रकारचे काम केले. हिमालयात माझे घडगे बांधा व त्यावर माझ्या देशाचा झेंडा लावा. अशाप्रकारे दोन त-हेच्या व्यक्ती असतात एक व्यक्ति आहे ती आत्मसाक्षात्कारी आहे तो आत्म्याच्या प्रकाशात आपल्या सगळ्या गोष्टींकडे दृष्टी टाकताना व्यापकता येते. तसेच हे काम केल्यावर माझे नाव वाढेल. लोक माझे यशोगत करतील अशी त्याच्या मनाची धारणा होत नाही कोणी त्याला मारले, त्रास दिला, छळ केला अगर काही वाईट केले तरी तो त्या गोष्टीबद्दल कधी वाईट वाटून घेत नाही. जसे आपण पहातो की, जेव्हा येशू ख्रिस्तांना सुळावार चढविले गेले. सुळावर चढताना त्यांनी एक प्रार्थना केली की, "हे जगदीशा, आपण काय चुका करीत आहोत हे या लोकांना समजत नाही. तू त्यांना क्षमा कर" अशा त-हेने जो आत्मसाक्षात्कारी असतो तो निस्पृह असतो. कोणत्याही गोष्टीबाबत त्याच्या मनात संदेह असत नाही. जी गोष्ट होणार आहे ती केलीच पाहिजे. एखादी गोष्ट ठीक झाली नाही तरी तो ठीक झाली असे समजतो. कोणत्याही प्रकारच्या सुखदुःखाचे स्मरण करण्याची अपेक्षाही करीत नाही असा माणूस सुख दुःख यांच्या फे-यात सापडत नाही. सुख दुःखात तो समरस होऊ शकतो. कसलेही दुःख झाले तरी तो ते पहातो व सुख आले तरी तो एकच दृष्टीने पाहू शकतो. सुखदुःख हा दिवसरात्र यांचा फेरा आहे असे तो समजतो. कारण तो स्वतः आनंद सागरात स्थिर असतो. कारण आत्मा हा आनंदाचा झरा आहे. आत्मा कोणत्याही गोष्टीची लालसा करीत नाही व ती लालसा निर्माणच होत नाही त्याला आपल्या मनावर कधीही नियंत्रण आणावे लागत नाही. मन व इंद्रिये यांचेवर ताबा ठेवावा असे म्हणतात. परंतु ती संपूर्ण ताब्यात आलेली असतात. एखादी वस्तू आपणास पाहिजे त्यासाठी प्राण वेचण्याची वेळ येत नाही. तसा अहंकारही शिल्लक राहात नाही.

काही लोक असे असतात की, ते एखादी वस्तूच्या प्रलोभनामुळे जशी काही ती वस्तू म्हणजे अगदी जीवन सर्वस्व आहे असे समजून त्यापाठमागे पळत सुटतात. जर ती वस्तू मिळाली तर दुस-या वस्तूसाठी पळत सुटतात आणि जर ती वस्तू मिळाली नाही तर माझे जीवनच संपले असे समजून फार दुःखी होतो. अशा माणसाचे चित्त बाह्यात्कारी असते. त्याचे चित्त ज्या ज्या ठिकाणी पोहोचते ते स्वतः कार्यान्वित होते.

चित्त ही ब्रम्हदेवाची देणगी आहे. परंतु जेव्हा ब्रम्हदेव अगर ब्रम्हदेवाचा फक्त ब्रम्ह राहातो त्या वेळेला असे चित्त इतके प्रभावशाली होते. इतके प्रेममय होते, इतके जाणकार होते आणि इतके दक्ष होते की, ते आपले कार्य अतिशय सुलभरितीने करून घेते. विशेष म्हणजे अशा माणसाचे चित्त परमचैतन्याशी एकरूप होते आणि जेव्हा अशी स्थिती येते तेव्हा परमचैतन्यच हे कार्य करीत असते. जगातील कोणतेही काम ही ब्रम्हशक्ति, हे परमचैतन्य करीत असते. आणि जे काम मनुष्य करीत असतो तो मी हे काम करीत आहे असे त्यावेळी समजत नाही. त्याची त्याला आठवणसुध्दा होत नाही. हे सगळे घडत आहे असाच विचार तो करीत असतो. यालाच अकर्मात उतरणे असे म्हणतात. कारण हे सारे कार्य परमचैतन्य करीत आहे व मी फक्त माध्यम आहे.

आत्म्याच्या प्रकाशाने हे सर्व होऊ शकते हेच अकर्मात उतरणे होय. नाहीतर मनुष्य असे म्हणतो की, हे सगळे कार्य मी करतो व परमेश्वरावर सोडून देतो. पण तो सोडू शकत नाही. खरी गोष्ट अशी आहे की, परमचैतन्य अतिशय सुगम रितीने हे सर्व कार्य करीत असते इतके सुंदर त्याचे कौशल्य आहे. या सगळ्या गोष्टींची रचना पाहून मनुष्य आश्चर्यचकित होतो. आणि जेव्हा मनुष्य श्रध्दापूर्वक आपल्या विशाल हृदयापासून काम करतो ते सफल होते. आणि लोक माझेकडे येऊन सांगतात की, श्री माताजी, मोठा चमत्कार झाला मी फक्त प्रार्थना केली आणि काम झाले. श्री माताजी, हा मोठा चमत्कार झाला. आम्ही कार्य करीत नसून परमचैतन्य काम करीत असते. ज्याप्रमाणे चांदीपासून दागिने बनवितात त्याप्रमाणे एखाद्या निर्जीव वस्तूपासून दुसरी वस्तू निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करतो व फार मोठे काम केले असे आम्ही समजतो. आम्ही फक्त एका निर्जीव वस्तूपासून दुसरी निर्जीव वस्तू तयार करतो परंतु सर्व जिवंत कार्य परमचैतन्यच करीत असते. आम्हाला ही परमचैतन्याची जी देणगी मिळालेली आहे व त्यापासून आम्हाला जो अनुभव मिळाला आहे हे सर्व आत्मसाक्षात्कारामुळेच आहे. कारण हे परमचैतन्य जे आहे ते आदिशक्ति आहे. शिवाची इच्छाशक्ति आहे व तिचा हा प्रकाश आहे. या परम चैतन्याच्या आशिर्वादामुळे आम्ही सारे कर्म करतो. ज्यांच्यामध्ये परमचैतन्य घटित झाले आहे से लोक प्रभावशाली बनू शकतात.

परंतु मी हे करीत आहे अशी भावना जर मनात आली व मी हे केले मी हे करू इच्छितो अगर एखादी गोष्ट जबरदस्तीने केली तर आपल्या आतमध्ये पूर्णपणे आत्म्याचा प्रकाश आलेला नाही असा त्याचा अर्थ होतो. आपण ज्यावेळी कोणतेच काम करीत नसतो त्यावेळी ते आपोआप घडत असते म्हणजे आपण अकर्मात आलेले असतो.

एखादा बल्ब जर मी प्रकाश देत आहे असे म्हणाला तर ती खोटी गोष्ट आहे. जे लोक आत्मसाक्षात्कारी आहेत त्यांच्या आतमध्ये परमचैतन्य कार्य करीत असते. ज्याने आपणास निर्माण केले व वाढविले तसेच शरीरादि गोष्टी ज्या बनल्या आहेत त्या परमचैतन्याच्या कृपेनेच बनलेल्या आहेत. त्यानंतर आपण आज मनुष्य बनून आत्मसाक्षात्कारी बनलो हा सुध्दा त्या परमचैतन्याचा आशीर्वाद आहे. तेव्हा अशा माणसामध्ये अहंकार कसा येऊ शकेल? मी काहीच करीत नाही एवढेच तो जाणू शकतो.

कृष्णाच्या मुरलीने जर म्हटले की, माझ्यातून मधूर आवाज निघतात असे लोक का म्हणतात? मी तर पोकळ आहे. पोकळपणा म्हणजेच अहंकाररहित अवस्था होय. ती अहंकाररहित अवस्था ज्यावेळी आपल्यामध्ये पूर्णपणे प्रस्थापित होते त्यावेळी आम्ही हे कार्य करतो, ते कार्य करतो असा जो विचार येतो तो किती दुःखकारक असतो, किती त्रासदायक असतो हे समजून येते. मी हे काम करीत होतो व मी हे काम केले पण त्यापासून अपयश आले तर मी दुःखी होतो. मी हे काम केले आणि त्यात मला मोठे यश मिळाले या विचाराने आपली बुध्दि अजून खराब होते. परंतू हे काम मी केले नाही, ते काम करणारे परमचैतन्य आहे, ही सारी त्याची

कुशलता आहे तेव्हा जे घडेल ते ठीक झाले असे समजावे.

एखाद्या वेळी आपण रस्ता चुकून भलत्याच जागी पोहोचलो तर आपण त्यावेळी रस्ता चुकला फार मोठी चूक झाली असे कोणी म्हणणार नाही. परंतु आत्मसाक्षात्कारी मनुष्य येथून जाणे आवश्यक होते म्हणून या वेगळ्याच रस्त्यावर आलो असा सरळ विचार करतो म्हणून त्याचा रस्ता चुकल्याचे दुःख होत नाही. त्याला काही त्रास होत नाही. आत्मसाक्षात्कारी माणसाला तुम्ही महालात ठेवले तर तो तेथे राजासारखा राहील. तसेच तुम्ही त्याला जंगलात ठेवले तरी जंगलातसुध्दा तो आनंदाने राहील. तो काहीही तक्रार करणार नाही कारण परमचैतन्यानेच मला इकडून तिकडे नेले हे तो ओळखतो. त्याला तुम्ही मारले अगर हार घातला तरी या दोन्ही गोष्टी ता सारख्याच समजतो. त्याला त्यात काही फरक वाटणार नाही. कारण आत्मा जो आहे तो कशालाही चिकटत नाही.

जेव्हा तुम्ही माझी प्रतिष्ठा मी मोठा माणूस, मी लहान माणूस अशा प्रकारच्या गोष्टींना चिकटला तर एखादा माझ्याशी असे का वागला? असा विचार केला तर तुम्ही अहंकारापासून अलिप्त होऊ शकत नाही. आत्मसाक्षात्कारी मनुष्य तो कोठेहि असला तरी त्याला लहानमोठेपणाची जाणीव होत नाही. तो आपल्या आत्म्यामध्ये आनंदात रहातो. ज्यावेळी बोलायचे त्याचवेळी तो बोलेल. ज्यावेळी आवश्यकता नसेल तेव्हा तो बोलणार नाही. कोणी काही सांगितले तर तो ते ऐकून घेतो. कोणी काही ज्ञानाची गोष्ट सांगितली तर ती ऐकून घेतो व अज्ञानाची गोष्ट सांगितली तरी ती ऐकून घेतो. लोकांच्या बाबतीत गुणदोषांचे वर्णन करील पण मला याचा तिरस्कार वाटतो असे म्हणणार नाही कारण तिरस्कार करणे हे एक पाप आहे आणि म्हणूनच आत्मसाक्षात्कारी माणसाकडून पाप होत नाही. तो जे करील ते पुण्य असेल.

देवी भूतांना मारते असे समजल्यास ते काही पाप नाही. भूतांना मारले नाही तर पाप फैलावेल. तेव्हा ती आपल्या कामापासून परावृत्त होत नाही कारण भूतांना परमचैतन्य मारीत असते. मी {माताजी} कुठे मारीत असते।. परंतु परमचैतन्याची ग्वाही देण्यापूर्वी त्यामध्ये एकरूप झाले पाहिजे, नाहीतर आपण परमचैतन्य सांगितले पण ते काही तुमच्या खिशात बसलेले नाही. जेव्हा आपणामध्ये ती स्थिती येते व आपण त्या उच्च स्थितीला पोहोचतो त्या ठिकाणी आपण परमचैतन्याशी एकरूप होतो. नंतरच एखादी गोष्ट चुकीची असली तर आपण तसे स्पष्टपणे बोलू शकता. मोठ मोठया साधुसंतांनी समक्ष धीटपणे सांगितले पण ते घाबरले नाहीत. सत्य बोलण्यासाठी सॉक्रेटिसला विष दिले गेले. त्याला अनेक प्रलोभने दिली काहीही केले तरी त्याने जे सत्य होते तेच सांगितले. कारण परमचैतन्याकडून सत्यच बोलविले जाते. व ते सत्यनिष्ठ असते. त्याच्या बुध्दीला सत्य व असत्याची ओळख होती. कोण खोटा कोण खरा हे जाणत होती. बुध्दीवर आत्म्याचा प्रकाश आल्यावर सुबुध्दी बनते. कोण किती खोल पाण्यात आहे हे तो एका नजरेत ओळखतो. आणि त्याला परमचैतन्य सर्वकाही सांगते. म्हणून परमचैतन्य मिळविणे हे महत्वाचे ठरते. आणि त्याचा उपभोग आम्ही घेऊ शकत नाही. त्याचा उपभोग परमेश्वरच घेत असतो. आपण फक्त त्याची लीला पहात असतो. तेव्हा आपण एखाद्या वस्तूचा उपभोग घेत असतो.

एखादा अध्यापक जो असतो तो या आत्म्याच्या प्रकाशाचे, त्याच्या कार्याचे, तसेच त्याच्या लीलांचे सर्व प्रकारचे विज्ञान आहे. त्याचे शास्त्र आहे. जर ही गोष्ट नीट समजून घेतली तर सृष्टीचे शास्त्र हे आत्म्यापासून येत असते असे समजून येईल. आणि जोपर्यन्त हे सर्व शास्त्र एकदम बेकार आहे कारण त्याच्यामध्ये फारच थोडे विज्ञान आहे की जे आपणास जड वस्तूंच्या बाबतीत आपणास जाणकारी देते. त्यामध्ये संतुलन असत नाही. सामाजिकता असत नाही. त्यामध्ये मनुष्यता असत नाही. आणि त्यात प्रेम नाही. त्यात कला नाही. त्यात काव्य नाही आणि त्यात आदर नाही ज्यामध्ये आत्मा आहे अशी एकही चीज नाही. एखाद्या मशिनसारख्या सर्व गोष्टी घडत असतात. सर्व विज्ञान जाणण्यासाठी माणसाला आत्म्याचा प्रकाश पाहिजे. आत्म्याच्या प्रकाशामुळे शास्त्राची सर्व उपांगे आपण समजू शकतो. जे आजपर्यन्त लोकांना उलगडून पहाता आले नाही. आत्म्याच्या प्रकाशामुळे विज्ञानाचा मार्ग जाणून घेता येईल. ज्याने सर्व जाणून घेतले आहे त्याने दुस-यास सर्व काही सांगण्याची जरुरी नाही कारण सगळयांजवळ ते समजण्याची कुवत नाही. ज्यावेळेस संधी येईल त्यावेळेस समजून दिले पाहिजे. त्यामुळे सहजयोगात सुध्दा पुष्कळ लोक वैतागून जातात. माझा बाप सहजयोगात नाही. माझी आई, माझा भाऊ, इ. सहजयोगात नाहीत. नसले तर नसले, तुम्ही तर आहात ना ? तुम्ही तुमच्याबरोबर रहा. मनुष्य जितका आपल्याबरोबर आनंदात रहातो तसा तो कोणाच्याही बरोबर इतका आनंदात रहात नाही कारण हे सर्व आपल्या आंतच आहे. त्यासाठी यांत हे नाही, त्यात ते नाही अशा त-हेच्या गोष्टींचा विचार करणे ठिक नाही. हृदयाचे कपाट पूर्ण न उघडल्यामुळे आपल्या मनात असे विचार येतात. जे आपले बाप, भाऊ, बहिणी आत्मसाक्षात्कारी आहेत त्यामुळे काही प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु अजून जे अर्धे अंधारात आहेत व अर्धे प्रकाशात आहेत त्यांच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतो आणि माझा भाऊ एखाद्या गोष्टीत फसला आहे असे विचार येतात. कोणावरही जबरदस्ती करता येत नाही. ते आपोआप सहजयोगात येतील अशा त-हेचा विचार आत्मसाक्षात्कारी करीत असतात. तो सर्वांना पहात असतो आणि आनंद लुटत असतो. माणसांच्या वेडेपणात सुध्दा तो आनंद मानीत असतो व विद्वत्तेत सुध्दा तो आनंद मिळवू शकतो. कोणी मूर्खपणाच्या गोष्टी केल्या असतील तर त्याच्यातूनही त्याला आनंद मिळतो. कोणी समजूतदारपणाच्या गोष्टी केल्या तर त्यातमनही तो आनंद मिळवू शकतो. सगळ्या गोष्टी मध्ये त्यला आनंदाचा एक प्रवाह दिसत असतो. एखादा मनुष्य विक्षिप्तपणाने वागत असेल तर तो त्याला एक नाटक आहे असे समजतो. जेव्हा एक आत्मसाक्षात्कारी माणूस क्रोधी माणसाला पहातो तेव्हा तो म्हणतो, वाहवा!, क्रोध कसा चढत आहे आता तर तो जादा वाढला. आता तो माझ्या चक्रामध्ये होता आणि आता तो सहस्त्रारपर्यन्त चढला. तो क्रोधी माणूस पाहून आत्मसाक्षात्कारी घाबरत नाही. त्याच्यामध्ये जी दृष्टी आलेली आहे तिला साक्षी स्वरुपातील निरंजन दृष्टी म्हणतात आणि साक्षी स्वरुपात तो समाजाचे इतके सुंदर विवरण करतो की ते पाहून हसू येईल. अतिशय गंभीर गोष्टीमध्ये आपण समजू शकाल की पुष्कळशा गोष्टी आपल्याला गंभीर वाटतात परंतु त्यामध्ये एक मोठा संदेश लपलेला असतो, आपल्याला जर उद्विग्नता आली तर ती आत्मसाक्षात्कारी माणसाला परमचैतन्यामुळे त्याची लगेच खबर लागते आणि आतताईपणाने जो काम करील तो संपून जातो. ती उद्विग्नता सुध्दा एक प्रकारे

कार्यान्वित होते. एखादी आल्हाददायक गोष्ट असेल तर ठीक आहे. परंतु काही अशाही गोष्टी असतात की त्यापासून उद्विग्नता येते. आणि असे कार्य का होते याचा मनुष्य विचार करू लागतो. असे होता कामा नये. त्याचा लौकरच इलाज केला जाईल.

जेव्हा मी प्रत्यक्ष रशियाला गेले होते, तेव्हा तेथे सात दिवस राहिले होते. आणि परत आले. नंतर तेथे योगाचे एक शिबिर होणार होते. तेव्हा आमच्या घरातून असे सांगण्यात आले की आताच जाऊन आलात आणि आता परत दोन दिवसासाठी जाण्यात काय फायदा आहे? तेव्हा मी असे सांगितले की, माझे तेथे जाणे जरूरीचे आहे. कारण तेथे जो इस्टर्न ब्लॉक आहे तो तोडायचा आहे. कारण तेथून सगळे लोक येतील आणि त्यामधील जे लोक पार होतील ते लोक तेथे गेल्यावर परमचैतन्य आपले काम करील. मी फक्त तेथे पंचेचाळीस मिनिटे बोलले आणि पंध्रा मिनिटात जागृती दिली आणि त्यानंतर ते लोक त्यांच्या देशात गेले व तेथून हे कार्य झाले. परमचैतन्याच्या कार्यासाठी आत्मसाक्षात्कारी लोकांची जरूरी आहे. आत्मसाक्षात्कारी लोकांच्या इच्छेनुसार परम-चैतन्याचे कार्य होत असते. जर आपली इच्छा असेल तर कार्य जरूर होऊ शकते आणि आपल्या इच्छेमध्ये शुध्दा शुध्दता असली पाहिजे. ज्याच्यात शुध्द इच्छा नाही ते स्वार्थी असतात व ते स्वतःबद्दलच विचार करीत असतात. कारण हे कार्य आत्म्याच्या बळावर होत असते आणि जो आत्मा जो आपला शिव आहे तो पूर्णपणे स्वच्छंद, निस्पृह, निराधार, निरंतर आणि नित्य असा आहे. म्हणून जो मनुष्य आत्मसाक्षात्कारी बनतो त्यामध्ये हे सारे गुण येतील.

आपल्या भोवती इतर गोष्टींचे आवरण असल्याने हे गुण आपल्या आत येत नाहीत. आपण राजा असा अगर दुसरे कोणी असा, आपण निस्पृह असतो. आतून आपण मुक्त असतो. आतून आपण कोणत्याही गोष्टीला लिप्त होत नाही. आपण अलिप्त असतो. आपण आतून कोणाचाहि द्वेष करीत नाही. एखादी गोष्ट मिळविण्याची आपल्यात लालसा असत नाही. या सगळ्या बाहेरच्या गोष्टी आपोआप सुटल्या पाहिजेत. आत्म्याचा सगळ्यात मोठा प्रकाश असा असतो की, त्यामुळे आपणास काहीही प्रयत्न करावा लागत नाही. कोणाला वश करण्याची जरूरी नाही. ज्यावेळी आपण आत्मसाक्षात्काराच्या प्रकाशात उतरतो तेव्हा आपला आतला अंधार नष्ट होतो हा फार मोठा फायदा होतो. ज्यांना अजून हा फायदा मिळाला नाही त्यांनी आपला आत्मसाक्षात्कार पूर्णपणे फलद्रूप झालेला नाही असे समजावे आणि आत्मसाक्षात्कार पूर्णपणे फलद्रूप झाला असेल तर आमच्या जीवनात, आमच्या आसपासच्या समाजात, आमच्या सहजयोगाच्या समाजात, प्रत्येक ठिकाणी एक नवीन प्रकारचा मनुष्य तयार व्हावयास पाहिजे की जो आत्मास्वरूप आहे. ज्यामध्ये आत्म्याचा प्रकाश पसरलेला आहे आणि ज्यामध्ये शिवाचे दर्शन होते.

ज्यावेळी शिवाचे लग्न झाले तेव्हा ते अगोदर जसे राहात होते त्याच रूपात ते तेथे गेले, याचा अर्थ असा आहे की, आपल्यात एखादे शारिरिक व्यंग असले व आपल्या आत आत्म्याचा प्रकाश असला, आपले शारिरिक स्वरूप कसेही असले पण आत आत्म्याचा प्रकाश असला की शिव आपल्याला मानतात. ते निसंग आहेत. यामध्ये आमची दोन अंगे दिसतात. आम्ही विष्णूस्वरूप असून ते आमचे बाह्यांग आहे आणि आतले अंग आहे ते

आमचे शिव आहेत. आणि त्या शिवासारखे आपण निस्पृह, स्वच्छंद आणि निरासक्त बनले पाहिजे. जर आम्ही आत्मा स्वरूप असलो तर बाहेरच्या कोणत्याहि गोष्टीची आसक्ति आमच्या आत येऊ शकत नाही. बाहेरून तुम्ही श्रीकृष्ण बना अगर दुसरे कोणी बना, आतला जो शिव आहे तो आपल्या जागेवर स्थित राहातो. तेव्हा आपण आत्मस्वरूप होऊन जातो व बाह्य अंगाचे महत्व किंचित राहात नाही आणि तेव्हा सगळ्या गोष्टीबद्दलच्या आपल्या ज्या भावना असतात त्या एकदम बदलून जातात.

श्री संत एकनाथ जेव्हा काशीला गेले होते तेव्हा त्यांनी एक कावड भरून गंगेचे पाणी घेऊन ते रामेश्वरला चालले होते. परंतू वाटेत त्यांनी एक तहानेने व्याकूळ झालेले गाढव पाहिजे. ते मरण्याच्या अवस्थेत होते. ते पाहून एकनाथांनी कावडीतून आणलेले गंगाजळ त्या गाढवाला पाजले तेव्हा लोक त्यांना म्हणाले, "तुम्ही हे काय करता? इतक्या दूरवर पायी चालत येऊन आणलेले पाणी तुम्ही ह्या गाढवाला पाजले।. तेव्हा ते म्हणाले, "माझा रामेश्वर पाणी पिण्याकरिता येथे उतरून आला". हा भक्तीचा जो सूक्ष्म भाव आहे तो एक आत्मसाक्षात्कारीच समजू शकतो. मी कावड घेऊन गेलो, पाणी आणून त्या गाढवाला पाजले हा बाह्य देखावा आहे. "मी कोण आहे" व काय करीत होतो ही भावना नष्ट झाली आणि परमचैतन्याने हे कार्य केले. या पागल दुनियामध्ये ते आले. त्यांना कोणीही ओळखले नाही. फक्त त्रास मात्र दिला. ते आत्मस्वरूप होते. ते शिवामध्ये स्थित होते. ते शिवस्वरूप होते असा जो मनुष्य असतो तो बाहेरून कसाहि असला तरी त्याची शिवस्थिती बाहेरून सुध्दा प्रकाशित होत असते. औदार्य ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे आणि हे औदार्य ही शिवाची शक्ति आहे. यापासून हृदय इतके उदार होते की, शिवाने राक्षसांना सुध्दा वरदान दिले. ते सगळ्या गोष्टी जाणीत होते. अशा रितीने जो शिवामध्ये स्थित आहे तो आपल्यामध्ये मोठा समाधानी असतो. तो सर्वकाही ओळखतो सर्व काही जाणतो. तो सांगणार नाही सर्वकाही जाणीत असतो.

प्रेम ही शिवाची सगळ्यात मोठी शक्ति आहे. ज्यामध्ये व्याज पावे लागत नाही असे निर्व्याज प्रेम ही शिवाची शक्ति असून ती वाढत असते. शिवाची करूणेची शक्ति इतकी जबरदस्त आहे की, त्या करूणेला पाहून आपणसुध्दा आश्चर्यचकित व्हाल. अज्ञात-हेने एका आत्मसाक्षात्कारी मनुष्याचा करूणेचा भाव वाढत जातो. आणि त्याची जी नशा चढते ती अशी नशा आहे की, एकटेपणात मजा येत नाही. अशाप्रकारे त्याची प्रकृती अशी होऊन जाते की, तो अत्यंत शक्तिशाली बनून जातो. त्याच्या शंका व भीती संपूत जातात आणि मोठ्या युक्तीने तो पुष्कळ सुंदर कामे करू शकतो. आणि कोणत्याही गोष्टीची ओळख उत्तमप्रकारे करून देऊ शकतो.

एखाद्या माणसाला काही सहजयोगी "तुम्हाला भूत लागले आहे" असे सरळ सांगतात असे सरळपणे सांगू नये आणि कोणाचा अहंकार कमी करायचा असेल तर तुम्ही फक्त तो अहंकारी आहे असा विचार केल्यास परमचैतन्य त्याची व्यवस्था करते आणि त्याचा अहंकार कमी होऊन जातो. परंतू आत्मसाक्षात्कारी माणसाने असा विचार करायला पाहिजे की, "मी शिवामध्ये शरणागत आहे. मी माझ्या आत्म्यामध्ये शरणागत आहे आणि माझ्या आत्म्यामुळेच हे परमचैतन्य कार्य करणार आहे. आणि त्यासाठी मला कोणत्याही गोष्टीची चिंता नाही.

माझा शत्रू कोण आहे. मला कोण मारू शकतो. मी तर परमचैतन्यातच असतो. सर्व काही परमचैतन्यच करीत असते. मी तर कोणतेच कार्य करीत नाही अशाप्रकारची जेव्हा आपली भावना होते तेव्हा आपण आतल्या शिवाला ओळखले असे समजावे. आम्ही आमचे शरीर व इतर गोष्टी सर्वकाही जाणतो. परंतू आपल्या आतमध्ये असलेल्या शिवाला ओळखणे आवश्यक आहे. जो शिव आमच्या सा-या शक्तीचा आधार आहे, आम्ही ज्या शिवाला सच्चिदानंद म्हणतो त्या शिवाला आपण मानले पाहिजे. तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

